स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, जळगांव


फोननं.-0257-2217640 Email-dydeojalgaon@gmail.com


जा.क्र./निवड-1/कावि/ 164 / 2026 दिनांक:- 15 /05/2026

**प्रति,**
जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी ( NIC )
जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव.

**विषय :-** विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी ई निविदा जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मान्यता प्राप्त संस्थेकडुन विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर माहिती जिल्ह्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेकामी PDF Format मध्ये NIC च्या ईमेल वर पाठविली असुन हॉर्ड कॉपी या पत्रासोबत जोडलेली आहे. सदर ई-निविदा जिल्ह्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(रोहन घुगे)
**जिल्हा निवडणूक अधिकारी**
**जळगांव.**


Scanned with OKEN Scanner

# ई-निविदा सुचना

जिल्हा निवडणुक अधिकारी, जळगाव यांचेकडुन मान्यता प्राप्त संस्थेव्दारे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फॉर्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे व्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईट वरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहिल. निविदेच्या अटी व शर्ती इ. तपशील http://mahatenders.gov.in व www.jalgaon.nic.in यासंकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन ई-निवीदा सादर करण्याची अंतिम तारीख 01/06/2026 रोजी 12.00 वाजे पावेतो आहे.

क्र.निवड-1/ 163 /कावि/2026

जळगांव, दि. 15/05/2026

(रोहन घुगे)
**जिल्हा निवडणूक अधिकारी**
**जळगांव**

Scanned with OKEN Scanner

"सर्वसमावेशक, सुलभ आणि सहभागपुर्ण निवडणूका"

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, जळगांव

फोन नं.-0257-2217640 Email-dydeojalgaon@gmail.com

क्र.निवड-1/कावि- 165 / 2026 दि. 15/05/2026

## ई-निविदा सूचना क्रमांक - 06/2026

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, जळगांव मार्फत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी अनुभवी व सक्षम अभिकर्त्यांकडून विहीत नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणाली द्वारे मागविण्यात येत आहेत.

सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. कामाचे नाव: विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्दीबाबत.

**कामाची अंदाजित किंमत रु. 70,00,000/-( अक्षरी सत्तर लक्ष मात्र )**

| | |
|---|---|
| कोऱ्या ई-निविदा फॉर्मची किंमत | 20000/- |
| बयाणा (EMD) रक्कम | 200000/- |
| सुरक्षा अनामत रक्कम - 3% | 210000 |
| ई-निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक- 18/05/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता |
| ई-निविदा सादर करण्यासाठीचा कालावधी | दिनांक-18/5/2026 सकाळी/दुपार-11:00 वा. पासून दिनांक-01/6/2026 सकाळी/दुपार-12:00 वा.वाजे पर्यंत |
| ई-निविदा तांत्रिक लिफाफा उघडणेचा दिनांक व वेळ | **दिनांक- 03/6/2026 रोजी दुपारी -12:00 वाजता** |
| ई निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव (निवडणूक शाखा) |

1. http://mahatenders.gov.in आणि www.jalgaon.nic.in या संकेतस्थळांवर सदर निविदेची माहिती उपलब्ध आहे.
2. निविदाधारकांनी http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या आहेत निविदा फॉर्म फी (ना-परतावा) भरावी लागेल. तसेच बयाना रक्कम (परतावा) भरावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

3. निविदेचा निकाल अधिसुचित करण्यात आल्या नंतर पात्र निविदाधारकाने 07 दिवसाचे आत अनामत रक्कम रुपये (आदेशाच्या मुल्यांच्या 3%) बँकगँरंटीव्दारे जमा केले नंतर कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येईल.
4. प्राप्त निविदा स्विकारणे, नाकारणे किंवा स्थगित करणे बाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांनी राखून ठेवले आहेत.
5. निविदा धारकांनी निविदाशुल्क (ना-परतावा) तसेच इसारा/बयाना रक्कम ह्या रकमा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचे चालु खाते क्रमांक 3826335977, IFSC-SBIN0000393, जिल्हा पेठ जळगांव या खात्यात जमा करावी व बँकेत रकमा जमा केल्याबाबतच्या पावत्या सादर केलेल्या कागदपत्रांसोबत जोडणे आवश्यक आहे.

(रोहन घुगे)
**जिल्हा निवडणुक अधिकारी ,**
**जळगांव.**

Scanned with OKEN Scanner

**निविदा फार्म क्र. 1**
**तांत्रिक लिफाफा**
**(छाननी सूची)**

**छपाई (Printing) करणेबाबतचे दर निश्चित करणेबाबत**

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| 1 | संस्थेचे / निविदा धारकाचे नांव व संपुर्ण पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक व ईमेल | |
| 2 | निविदाधारक संस्था नोंदणीची प्रत. shop Act, | |
| 3 | पॅनकार्डची प्रत. | |
| 4 | जी.एस.टी (G.S.T.) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. | |
| 5 | मागील 3 वर्षात GST Clearance प्रमाणपत्र अथवा GST चलन प्रती. | |
| 6 | मागील 3 आर्थिक वर्षाचे आयकर भरले बाबतचे विवरणपत्रे. | |
| 7 | सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले मागील 3 वर्षाची आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र (Turn Over Statement) | |
| 8 | निविदा किंमत व बयाणा (EMD) रक्कम ही स्टेट बँक ऑफ इंडिया, जळगाव येथील Dy.District Election Officer, Jalgaon यांच्या नावे असलेल्या Current A/C No. 38343359377 मध्ये भरणा केलेबाबतची प्रत. | |
| 9 | अटी व शर्ती मान्य असलेबाबत व कुठल्याही शासकीय निमशासकीय विभाग / कार्यालयाचे कामाच्या काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबत प्रतिज्ञापत्र. | |
| 10 | निविदा धारकास शासकीय / निमशासकीय कार्यालयांना छपाईसेवा पुरविण्याचा अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र. | |
| 11 | प्रपत्र-1 | |
| 12 | प्रपत्र-2 | |
| 13 | पुरवठादाराकडे उपलब्ध मनुष्यबळ व सामुग्रीचा तपशिल. ( प्रपत्र -3 ) | |
| 14 | निविदा सादर कर्त्यास दिलेले प्राधिकारपत्र (लागू असल्यास) | |

दिनांक- / /2026
ठिकाण-

निविदाधारकाची स्वाक्षरी,
(नाव, शिक्का वपूर्ण पत्ता नांव)

Scanned with OKEN Scanner

**ई-निविदा क्रमांक- 06/2026.**

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी ई - निविदा.

---

**आगामी विशेष सखोल (SIR) पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने 2 दिवसात सर्व Enumeration Form छपाई पुर्ण करणे आवश्यक असल्याने** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, जळगांव यांचेमार्फत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी अभिकर्त्यावर खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील. निविदा दोन लिफाफे पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन सादर करावयाची आहे. प्रथम तांत्रिक लिफाफा उघडला जाईल. त्यात खालील नमूद कागदपत्रांचे छाननी अंती किमान तीन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास वाणिज्य लिफाफा उघडला जाईल.

अ)**तांत्रिक लिफाफा (क्र.1)** - तांत्रिक लिफाफ्यात खालील कागदपत्र स्वसाक्षांकित करुन जोडणे अत्यावश्यक असेल.

1. सक्षम अधिकाऱ्याकडील स्वतंत्र फर्म/संस्था इत्यादीचे नोंदणी तसेच नुतनीकरणाच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत. (शॉप ॲक्ट प्रत)
2. निविदा फॉर्म व बयाणा (EMD) रक्कम चा (ऑनलाईन) भरणा केलेबाबत स्कॅन केलेली पावती. इसारा रक्कम सूट असल्यास MSME अंतर्गत नोंदणी असलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3. पॅन कार्ड प्रत.
4. वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रती.
5. मागील वर्षातील वस्तु व सेवाकर (GST) Clearance प्रमाणपत्र अथवा भरलेबाबतच्या चलनाची छायांकित प्रत.
6. मागील तीन वर्षातील आयकर (Income Tax) विवरण पत्राची छायांकित प्रत.
7. मागील तीन आर्थिक वर्षातील सरासरी किमान **रु. 45 लक्ष 50 हजार** आर्थिक उलाढाल दर्शविणारे मान्यता प्राप्त सनदी लेखा परिक्षकाकडील प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
8. निविदा धारकांस निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच कुठल्याही शासकीय/ निमशासकीय /कार्यालयाचे कामाच्या काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबत स्वघोषणापत्र.
9. निविदा धारकास शासकीय / निमशासकीय कार्यालयांना छपाई विषयक सेवा पुरविण्याचा अनुभव असल्यास कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक राहील.
10. निविदाधारकाकडे उपलब्ध साहित्य व सामुग्रीचा तपशिल.
11. निविदाधारकाकडे उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळाची माहिती.
12. निविदाधारकाकडे जळगांव जिल्ह्यात स्वत:चे establishment (set up) उपलब्ध असलेबाबतचा पुरावा. Geotag Photo सह सादर करावा.

(ब) **वाणिज्यिक लिफाफा(क्र. 2)**

**वाणिज्यिक लिफाफा भरतांना खालील दक्षता घ्यावी.**

1. निविदेचे दर विहीत केलेल्या फॉर्म नं. 2 मध्येच भरावे.
2. निविदेच्या फॉर्म नं. 2 मध्ये दिलेल्या प्रत्येक बाबीचे दर अचुक (अक्षरी व अंकी) नमूद करावेत.

Scanned with OKEN Scanner

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, जळगांव.**

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करणेसाठी निविदा.

---

## अटी व शर्ती

1. निविदा या http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत निविदा फॉर्म मध्येच सादर करावयात.
2. मा. निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम 2026 जाहिर केला असल्याने त्यासाठी मा. निवडणूक आयोगाने कालमर्यादा ठरवून दिलेली असल्याने तसेच दिलेल्या वेळेत काम पूर्ण करावयाचे असल्याने (2 दिवसांत अंदाजे 75 लक्ष प्रति प्रिंट आवश्यक असल्याने) जळगांव जिल्हयात स्वत: चे establishment (Set up) असलेबाबत Geotag photo सह पुरावा सादर करणे आवश्यक आहे.
3. निविदा दोन लिफाफे पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन सादर करावयाच्या आहेत. (तांत्रिक व वाणिज्य लिफाफा)
4. लिफाफा क्र.1 मध्ये जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांनी नमुद केलेले सर्व अत्यावश्यक कागदपत्र जोडलेले असतील तर पात्रतेअंती निविदाधारकाचा लिफाफा क्र. 2 उघडण्यात येईल.
5. निविदेमध्ये वाणिज्य लिफाफयात प्रत्येक बाबीचा एकच दर सुस्पष्टपणे नमुद करावा. कोणतीही खाडाखोड असू नये. एकापेक्षा जास्त दर नमुद करु नयेत. अन्यथा त्या निविदेतील कोणत्याही दराचा विचार केला जाणार नाही.
6. निविदेतील कामाचे दर (सर्व करांसहीत )ऑनलाईन पध्दतीने BOQ मध्ये एकदाच व सुस्पष्ट भरणे आवश्यक आहे.
7. निविदा फॉर्म डाऊनलोड केल्याची फी व बयाणा (EMD) रक्कमेची फी ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावी, त्याशिवाय निविदा वैध राहणार नाही. तसेच निविदे सोबत जोडण्यात आलेले सर्व कागदपत्र, प्रपत्र, प्रतिज्ञापत्र स्कॅन करुन अपलोड करावेत.
8. निविदाधारक यांचेकडेस प्रशिक्षीत मनुष्यबळ आणि वाहने असणे आवश्यक आहे. सामानाची ने-आण करणेकरीता शासकीय वाहन पुरविले जाणार नाही, अथवा त्यासाठी वापरलेल्या वाहनाचा मोबदला दिला जाणार नाही.
9. निविदाधारक यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत काळजी घ्यावी. छपाई कामकाजाच्या वेळी काही दुर्घटना घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील. यासाठी आवश्यक विमा वगैरे इ. तरतुदी निविदाधारकानेच कराव्यात.
10. मंजूर निविदाधारकामार्फत् पुरविण्यात येणारे कर्मचारी 18 वर्षावरील असणे आवश्यक आहे.
11. कामाच्या अंदाजीत रकमेत वाढ अथवा घट होऊ शकेल या बाबतचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव यांना राहतील.
12. मंजुर निविदाधारकास जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची अग्रीम (ॲडव्हान्स) रक्कम दिली जाणार नाही.
13. निवडणूक कामकाजाच्या वेळी अधिकारी/ कर्मचारी उपयोगात आणत असलेले कार्यालयीन साहित्य मा. भारत निवडणूक आयोगाची मालमत्ता आहे. सदर साहित्यास परवानगी शिवाय हाताळू नये.

Scanned with OKEN Scanner

14. निविदाधारकास नेमून दिलेल्या तारखेस व नमूद संख्येनुसार, निर्देशित केलेल्या ठिकाणी छपाई प्रती पोहोच कराव्या लागतील, या संदर्भात कोणत्याही सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत.

15. निविदाधारकास निविदेसंबंधी अटी व शर्ती मान्य असलेबाबत व काळया यादीत समावेश नसलेबाबत स्वघोषणापत्र करुन दयावे लागेल. प्रतिज्ञापत्राचा नमुना निविदा अर्जासोबत देण्यात आलेला आहे.

16. निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबंधी बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरवण्यास एखाद्या व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे निविदाधारकाचे प्राधिकारपत्र (Bidders Power Of Attorney) देणे आवश्यक आहे.

17. निविदा धारकाने निविदेत नमूद केलेल्या अटी / शर्ती नियम या व्यतिरिक्त स्वत:ची कोणतीही अट निविदेत समाविष्ट करु नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

18. छपाईसाठी किमान 80 जीएसएम A-4 साईजचा पेपर व उच्च् प्रतिची शाईचा वापर करावा लागेल.

19. ई-निविदा प्रक्रियेच्या दरम्यान किंवा निविदा स्विकृती नंतर कोणतेही विवाद उद्‌भवल्यास जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी जळगांव यांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

20. निविदाधारकाने ई-निविदा भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपुर्वक वाचन करुन तद्‌नंतर ई-निविदा फॉर्म भरावा. अपुर्ण माहिती असलेली ई-निविदा बाद करण्यात येईल.

21. निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास रक्कम (आदेशाच्या मुल्याच्या 3%) इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून 7 दिवसांचे आत जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगाव यांचे नांवे बँक गॅरंटीच्या स्वरुपात जमा करणे आवश्यक आहे. सदर रकमेची बँक गॅरंटी वेळेत जमा न केल्यास निविदा रदद होईल.

22. मंजूर निविदाधारकास अगोदर निविदेतील अटी व शर्तीना बांधिल असल्याचा करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. तदनंतरच कार्यारंभ आदेश देणेत येईल.

23. निविदाधारकास कोणत्याही प्रकारे उपनिविदाधारक / सेवापुरवठादार नेमता येणार नाहीत.

24. निविदा मंजूरीनंतर दिलेल्या कामाची गुणवत्ता राखण्यात वा विहीत कालावधीत काम पुर्ण करण्यात निविदाधारक अयशस्वी होत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर काम दुसऱ्या सेवा पुरवठादाराकडून करुन घेण्यात येईल व याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव निश्चित करतील अशी भरपाई रक्कम निविदाधारकास भरावी लागेल. तसेच अशा परिस्थितीत निविदाधारका बरोबरचा करार रद्द करुन त्यास काळ्या यादीत टाकणेत येईल.

25. निविदाधारकास कोणत्याही राजकिय पक्ष/उमेदवार/संघटना यांचेशी संबंध ठेवता येणार नाहीत. तसेच निविदेद्वारे जे शासकीय काम देणेत येईल व संबंधित कागदपत्रे देण्यात येतील त्याबाबत पूर्णत: गुप्ततेची हमी द्यावी लागेल.

26. निविदेसोबत सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसाक्षांकित केलेल्या असाव्यात.

27. निविदेतील नमुद कामांची एकत्रित सरासरी कमी असलेली निविदा मान्य करणेत येईल. तथापि यामध्ये कामाच्या गुणवत्तेचा, निविदाधारकांच्या कामाबाबतचा पुर्वानुभव व सर्वसाधारण कामाबाबतची पत यांचा देखील विचार करणेत येईल.

28. निविदेमध्ये मंजूर केलेले दर सर्व समावेशक असावेत. त्याबाबत इतर कोणतीही वेगळी भरपाई / कर दिला जाणार नाही. वाटाघाटी अंती (Negotiation) मंजूर केलेल्या निविदेतील दरामध्ये कुठल्याही परिस्थितीत वाढ केली जाणार नाही.

29. जिल्ह्यात / जिल्ह्याबाहेरुन वाहतूक करतांना लागणारा पथकर व वाहतुक खर्च निविदाधारकास करावा लागेल.

Scanned with OKEN Scanner

30. मंजूर निविदाधारकास अदा करण्यात येणा-या देयकामधून लागू असणा-या शासकीय करांच्या 2% रक्कमेची कपात ( GST/TDS ) करण्यात येईल. त्याव्यतीरिक्त उर्वरित संपुर्ण कराची रक्कम अथवा लेखापरिक्षणातील वसुलीची रक्कम भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
31. छपाई (Printing) करणेकामी या कार्यालयाने नेमलेल्या सध्याच्या अभिकर्त्याच्या कामाची मुदत 1 वर्षापर्यंत राहील.
32. निविदा प्रसिध्दीनंतर प्रथम वेळेस अल्प प्रतिसाद मिळाल्यास म्हणजेच कमीत कमी 3 पात्र निविदा प्राप्त झाल्या नसतील तर पुन्हा 7 दिवसांकरीता निविदेस मुदतवाढ देण्यात येईल. दोन वेळेस मुदतवाढ दिल्यानंतर प्राप्त निविदेतून निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
33. निविदाधारक/संस्था यांना काळया यादीत घोषित केलेले असल्यास त्यांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. यासाठी निविदाधारकाने काळया यादीत नसल्याबाबतचे (विहित नमुन्यात) प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
34. करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव हे ठरवतील ती रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम / बँक गॅरंटीची रक्कम जप्त करण्यात येईल.
35. कामाच्या अंदाजित रकमेत वाढ किंवा घट होऊ शकेल, या बाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांना राहतील.
36. मंजूर निविदाधारकास पुरवठा केलेल्या छपाई (Printing) देयकाची रक्कम ही शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरच अदा करणेत येईल. काही कारणास्तव रक्कम मिळण्यास विलंब झाला तरी त्यावर कोणतेही व्याज अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही.
37. उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दिनांक 01 डिसेंबर 2016 मधील सर्व अटी व शर्ती तसेच ई-निविदा संदर्भात केंद्र व राज्य शासनांचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रक मध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी, शर्ती व नियम मंजूर निविदाधारकास लागू राहतील.
38. निविदा दरम्यान कुठलेही कायदे विषयक वाद / विवाद उदभवल्यास जळगांव जिल्हा न्यायालयाचे कार्यक्षेत्रातच राहतील.
39. ई-निविदा संदर्भात केंद्र /राज्य शासन अथवा निवडणूक आयोग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसारच कामाच्या रकमेत अथवा संख्येत वाढ किंवा घट होउ शकेल व त्या अटी व शर्ती पुरवठादास बंधनकारक राहतील.
40. निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच निविदेतील अटी / शर्ती मध्ये बदल करणे अथवा कोणत्याही टप्यावर निविदा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांनी राखून ठेवले आहेत.

(रोहन घुगे)
**जिल्हा निवडणुक अधिकारी ,**
**जळगांव.**

Scanned with OKEN Scanner

**वाणिज्यिक लिफाफा (फॉर्म क्र.2)**

**(BOQ)**

1. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी खालील प्रमाणे दरपत्रक देत आहे.

| Sl No | Description of Work / Item (S) | No.of Qty. | Rate including all Taxes (Rs) |
|---|---|---|---|
| 1 | Printing of A/4 size Paper ( Both side) | 1 | |

1. **वरील नमुद बाबनिहाय दरांपैकी एकत्रित सरासरी कमी असलेला दर (L1) ग्राहय धरण्यात येईल.**
2. **निविदाधारकांनी प्रचलित शासन नियमांनुसार देय असलेल्या सर्व करांसह दर नमुद करावेत.**

**ठिकाण-**

**दिनांक-** / /2026.

**निविदाधारकाची सही**
**रबर स्टॅम्पसह**

**टिप :- वरील दोन्ही लिफाफे ऑनलाईन सादर करावयाचे आहेत. BOQ सह अटी व शर्ती http://mahatendars.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र - 1

## निविदा सादर करावयाच्या दिवसापर्यंत इतर कार्यालये / संस्था इ.कडे सादर केलेल्या / हातात असलेल्या छपाई (Printing) करणेबाबतचे निविदांची माहिती

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाचे स्थळ | हातात असलेल्या निविदा कामाची किंमत | काम शिल्लक असल्यास शिल्लक कामाची किंमत | शिल्लक काम कधी पर्यंत पुर्ण होईल | निविदा सादर केलेल्या कामाची किंमत | सदर काम कधी पर्यंत पुर्ण होऊ शकते | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

**सूचना** :-छायांकीत प्रती जोडाव्यात.

**निविदाधारकाची सही**
**रबर स्टॅम्पसह**

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र — 2

छपाई (Printing) करणेबाबतचे

निविदाकार यांनी यापुर्वी पुर्ण केलेल्या कामांचा तपशिल

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचे आदेश दिलेल्या कार्यालयाचे / संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | कामाचा कालावधी | स्थळ /ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

**सूचना** :-छायांकीत प्रती जोडाव्यात.

निविदाधारकाची सही
रबर स्टॅम्पसह

Scanned with OKEN Scanner

प्रपत्र -3

## निविदा सादर करणा-या संस्थेकडे उपलब्ध साहित्याचा /मनुष्यबळाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | विवरण |
|---|---|---|
| 1 | निविदा सादर करणा-या संस्थेचे व्यक्तींचे नाव / पत्ता/ई-मेल/मोबाईल क्रमांक | |
| 2 | संस्थेकडे छपाईसाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विस्तृत तपशिल<br><br>अ) उपलब्ध सामग्री / मशिनरी(संख्या आणि तपशिल नमूद करावा)<br><br>ब) संस्थेकडे असलेले मनुष्यबळ | |
| 3 | संपर्क करावयाच्या कर्मचा-यांचे नाव, पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |

निविदाधारकाची सही
रबर स्टॅम्पसह

Scanned with OKEN Scanner

दिनांक :-        /      /2026

प्रति,

**मा. जिल्हा निवडणूक अधिकारी,**

जळगांव

मी, जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) जळगांव यांचे मार्फत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 तसेच मा. भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी **छपाई (Printing) करणेबाबतचे कामासाठी** सोबत जोडल्या प्रमाणे तांत्रिक व वाणिज्यिक लिफाफ्यात माझी निविदा सादर करीत आहे. निवेदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्यास मी बांधील आहे.

स्वाक्षरी

**निविदाधारकाची स्वाक्षरी,**

**नाव,शिक्का व पूर्णपत्तानांव**

Scanned with OKEN Scanner

# स्वघोषणापत्र

मी ------------------------------------------------------------------------------------------याव्दारे सत्य प्रतिज्ञेवर नमूद करतो की, विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत विविध प्रकारचे फार्म व त्याअनुषंगाने लागणारे छपाईचे अनुषंगिक बाबींची छपाई करण्यासाठी निविदा सादर करीत असून निविदेत नमूद केलेल्या संपूर्ण अटी व शर्ती मी काळजी पुर्वक वाचल्या असून त्या मला मान्यआहेत. मी ---------------- ----------------------------------------------संस्थेतर्फे सादर केलेली निविदा मंजूर झाल्यास निविदेतील अटी व शर्तीनुसार मी छपाई (Printing) वेळेत व गुणवत्तापुर्ण करून देईल तसेच मी निविदेव्दारे जे शासकिय काम कागदपत्रे /साहित्य देण्यात येईल, त्याबाबत गुप्ततेची हमी देत आहे. तसेच निविदेचा निश्चित कालावधी व अंतिम दर मला मान्य राहील.

प्रस्तृत निविदाधारक/संस्थेचा कोणत्याही कारणास्तव काळया यादीत समावेश नसून मला याबाबत पूर्ण जाणीव आहे की, खोटी माहीती दिल्यास किंवा माझे कामकाजात कोणत्याही प्रकारचा कसूर / दिरंगाई झाल्यास मा.जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव निश्चित करतील अशा दंडास व शिक्षेस मी पात्र राहील.

करीता निविदाधारक /संस्था------------------------------------------------तर्फे खाली स्वाक्षरी करीत आहे.

( निविदाधारकाची सही )
(संपूर्ण नांव व पत्ता, संपर्क क्र)

**साक्षीदार**

1) श्री. ........................................................ रा. ........................................ सही

2) श्री. ........................................................ रा. ........................................ सही

Signature Not Verified
Digitally signed by Archana Arjun More
Date: 2026.05.18 14:01:00 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner